# राजकीय मुजोरीपायी

# उध्वस्त बालपण



महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण - एक विश्लेषण

समर्थन

समर्थन


**कार्यकारी मंडळ**

प्रा. सदानंद वर्दे (अध्यक्ष)
श्री. जी. बी. पिंगुळकर (उपाध्यक्ष)
श्री. विवेक पंडित (कार्याध्यक्ष)
श्रीम. नीता कोल्हटकर (सचिव)
डॉ. अमिता भिडे (खजिनदार)
श्रीम. अंजली कानिटकर (सदस्य)
डॉ. ध्रुव मंकड, (सदस्य)
श्रीम. प्रज्ञा सावरगांवकर (सदस्य)
डॉ. द्वारकादास लोहिया, (सदस्य)
श्रीम. विद्युल्लता पंडित, (सदस्य)
श्रीम. विजया चौहान, (सदस्य)
श्री. केशव नानकर, (सदस्य)
डॉ. रुपा कुलकर्णी, (सदस्य)



**संपादक :** प्रिया खान
**मुखपृष्ठ :** जयश्री घोसाळकर
**अक्षर जुळणी :** समर्थन संगणक विभाग
देणगी मूल्य : २५/-

**नोंदणी क्रमांक :**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८१०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई,
१५६७/१६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार) :**
समर्थन - द्वारा विधायक संसद,
८७/३, मुंबादेवी म्युनिसिपल शाळा,
काळबादेवी रोड, मुंबई - ४०० ००२.
दूरध्वनी : २२४२ ५२१२
टेलिफॅक्स : २२४२ ८२११
Email: samarthanmumbai@vsnl.net

**मुद्रक :**
चिंतनाक्षर ग्राफिक्स
१६, श्री हनुमान इंडस्ट्रिअल इस्टेट
जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई - ३१


**लोकशाही बळकट करण्याकरिता**
**उपेक्षितांचे 'समर्थन'**

ग्रामीण भागात विविध उपेक्षित समाजघटकांना त्यांच्या प्रश्नांवर संघटित करण्याचे काम अनेक व्यक्ती व संघटना करत आहेत. या संघटना गावागावातून विविध प्रश्नांवर काम करतात. शासनाकडे अन्यायाविरुद्ध दाद मागतात. त्यासाठी कधी कायदा हवा असतो, कधी कायद्यात दुरुस्ती हवी असते, तर कधी कायद्याची अंमलबजावणी हवी असते. या कामात ग्रामपंचायतीपासून राज्य सरकार व केंद्र सरकारपर्यंत विविध पातळ्यांवर काम करावे लागते. शासनाचे लक्ष वेधावे लागते व प्रश्नांचा सतत पाठपुरावा करावा लागतो. हे काम देशाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या व काम करणाऱ्या गटांना सातत्याने व नियमितपणे करणे शक्य होत नाही. त्यामुळे शासनाच्या धोरणात्मक निर्णयापर्यंत प्रत्यक्ष परिस्थितीचे अनुभव पोहोचत नाहीत. ही प्रक्रिया सुलभ व्हावी व प्रश्नांचे समर्थन नेटक्या रीतीने, नियमित व्हावे यासाठीचा संघटित व सुनियोजित प्रयत्न म्हणजेच 'समर्थन'.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

- ग्रामीण संघटनांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- प्रश्नांवर विविध क्षेत्रात चर्चा सुरू करवणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य पातळीवरील अधिकाऱ्यांकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्त्यांमध्ये विविध यंत्रणांबरोबर काम करण्यास लागणारी कौशल्ये तयार करणे व प्रशिक्षण देणे.
- विविध प्रश्नांची लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

राजकीय मुजोरीपायी

# उध्वस्त बालपण

## महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती - एक विश्लेषण

**समर्थन प्रकाशन**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | राज्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या - अधिकाऱ्यांनी चालविलेले स्वप्नरंजन | १ |
| २. | एक शिक्षकी शाळा व वर्गखोल्यांच्या अनुशेषामधील राज्याची प्रगती | ३ |
| ३. | शाळा नाही, पुढचे वर्ग उपलब्ध नाहीत हेच गळतीचे खरे कारण | ५ |
| ४. | शिक्षणाच्या हमीची ऐशीतैशी | ७ |
| ५. | वस्तीशाळा - सशक्तीकरणाची आवश्यकता | १० |
| ६. | सर्व शिक्षा अभियान . . . . सारे मागे जाऊ या! | १२ |
| ७. | योजनांचे कागदी घोडे | १५ |
| ८. | शालेय शिक्षण विभागाचे अर्थसंकल्पात खालावत चाललेले स्थान | १६ |
| | परिशिष्ट एक- शाळाबाह्य मुलांची संख्या | १९ |
| | परिशिष्ट दोन - एकशिक्षकी शाळा | २० |
| | परिशिष्ट तीन - गळतीचे प्रमाण | २१ |
| | परिशिष्ट चार - राज्यातील वस्तीशाळा | २२ |
| | परिशिष्ट पाच - राज्यातील म. फु. शि. हमी योजना केंद्रे | २३ |
| | परिशिष्ट सहा - हंगामी स्थलांतरीत मुलांसाठी सुरू केलेल्या म. फु. शि. हमी योजना केंद्रांची आणि विद्यार्थ्यांची संख्या | २४ |


# मनोगत

आदिम जमातीतील मुलांसाठी कोणत्या शैक्षणिक योजना राबविण्यात येतात, असा साधा प्रश्न शालेय शिक्षण विभागाला विचारला असता तब्बल दीड महिन्याने विभागाने त्याचे उत्तर दिले, 'आपण मागणी केलेल्या माहितीबाबत राज्य प्रकल्प संचालकांशी संपर्क साधावा'. दुर्बल घटकातील मुलांच्या शिक्षणाला विभाग किती प्राधान्य देते याचे हे बोलके उदाहरण आहे.

आकड्यांचे खेळ करत राज्यातील शिक्षण विषयक परिस्थिती कशी छान आहे याची चित्रे रंगविली जातात. विद्यार्थी-शिक्षक प्रमाण इतर राज्यांपेक्षा कसे चांगले आहे हे दाखवत असताना २५ हजार शिक्षकांची कमतरता आहे याकडे दुर्लक्ष केले जाते. राज्यातील गळतीचे प्रमाण राष्ट्रीय सरासरी पेक्षा कमी आहे हे छाती फुगवून सांगताना आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण या सरासरीपेक्षा जास्त असल्याचा जाणीवपूर्वक विसर पडतो.

या पुस्तिकेचा पूर्ण भर हा शिक्षणाच्या दर्जापेक्षाही शिक्षणाच्या उपलब्धतेवर आहे. शाळेत शिक्षक कसा शिकवतो या पेक्षाही जायला शाळा आहे का? हेच शिकणाऱ्यांच्या पहिल्या पिढीसाठी महत्त्वाचे ठरत आहे.

शाळाबाह्य मुलांची संख्या, एकशिक्षकी शाळांची संख्या, वर्गखोल्यांच्या अनुशेषाची संख्या वाढतच आहे. पुढच्या वर्गाच्या अनुपलब्धतेमुळे गळतीचे प्रमाण मोठे आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात शासन जर माध्यमिक शाळा सुरू करणार नसेल तर निदान खाजगी शाळांच्या अनुदानाच्या निकषांचा पुनर्विचार होणे तरी आवश्यक आहे. त्याअभावी आदिवासींच्या पिढ्यांची कत्तल होत आहे.

वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना या पर्यायी शाळांमधून मुले शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे गरजेचे आहे. अन्यथा या योजनांमधून काहीही हाती लागणार नाही. केंद्र शासनाकडून सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकत असताना राजकीय उदासीनतेपायी त्यावर पाणी सोडावे लागत आहे. शासनाकडे शिक्षणाच्या कोणत्याही नव्या योजना नाहीत हे २% होणारा योजनांतर्गत खर्च पाहूनच स्पष्ट होते.

वंचित मुलांचे शिक्षण हे आमच्या प्राथम्यक्रमात नाही, ती आम्ही गुंतवणूक मानत नाही. ही राजकीय मुजोरीच झाली, या मुजोरीपायी लाखो मुलांचे बालपण उध्वस्त झाले आहे.

– प्रिया खान

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

विरोधी पक्षांनी आपली भूमिका समर्थपणे पार पाडता यावी यासाठी नुकतीच शॅडो कॅबिनेटची संकल्पना अंमलात आणली. या शॅडो कॅबिनेटमध्ये शालेय शिक्षण विभागाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे. या जबाबदारीच्या निमित्ताने शालेय शिक्षण विभागाच्या योजनांचा, विभागाच्या प्रकाशनांचा अभ्यास करत असताना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षणाच्याबाबत भासविले जाते तेवढे पुरोगामी नाही हे लक्षात आले.

शिक्षण, आरोग्य आणि रोजगार ही त्रिसूत्रीच खऱ्या अर्थाने मानवी विकासाचा पाया आहे. आजचे युग हे माहिती–तंत्रज्ञान आणि विज्ञानाचे युग आहे. जागतिकीकरणाच्या मुद्द्यामुळे जग जवळ येऊ लागले आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत जर टिकायचे असेल तर टिकाऊ अशी शिक्षणनीती असली पाहिजे. उपेक्षित आणि वंचित घटकांनादेखील टिकाऊ आणि दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे.

समर्थन प्रकाशित करीत असलेल्या प्रस्तुत पुस्तिकेत राज्याच्या शालेय शिक्षण विषयक धोरणाचे अर्थपूर्ण विश्लेषण करण्यात आले आहे. समर्थनने पुस्तिकेत मांडलेल्या मुद्द्यांचा शासन/प्रशासन गांभीर्याने विचार करेल अशी आशा आहे. त्यातच पुस्तिकेचे यश आहे.

समर्थनच्या कार्यास शुभेच्छा.

धन्यवाद!

आपला,

विनायक निम्हण
सदस्य, विधानसभा, महाराष्ट्र राज्य

# राज्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या अधिकाऱ्यांनी चालविलेले स्वप्नरंजन

कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी त्या प्रश्नाची अचूक जाण असण्याची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे त्या प्रश्नाच्या रुपाने समोर आलेले आव्हान स्वीकारण्याची तयारी असल्याशिवाय प्रश्न सोडविता येत नाही. राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाबाबतही ते तेवढेच खरे आहे.

राज्यात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांची संख्या किती, या प्रश्नाला शासनाकडून वेळोवेळी मिळालेली उत्तरे पाहता शासन हे आव्हान स्वीकारण्यास तयार नाही हे लक्षात येते.

२००१-०२ च्या शालेय शिक्षण विभागाच्या निवडक शैक्षणिक सांख्यिकी या पुस्तिकेत दिलेली ६ ते १४ वयोगटातील मुलांची संख्या व पहिली ते आठवीत शिकणाऱ्या मुलांची संख्या लक्षात घेता **राज्यात १६ लाख मुले शाळाबाह्य असल्याचे चित्र दिसते**. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने वेळोवेळी दिलेली माहिती पाहता २००२-०३ या वर्षातील १५,७८,८६३ ही शाळाबाह्य मुलांची संख्या २००३-०४ मध्ये ५,२४,६८७ वर आल्याचे दिसते. त्याच्या पुढच्या वर्षी ही संख्या आणखी कमी होऊन २,९४,२२४ वर आलेली दिसते. दोन वर्षांच्या कालावधीत १२ लाख ८४ हजार मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणल्याचा दावा शिक्षण विभाग करीत आहे. *(परिशिष्ट - १)*

शाळाबाह्य मुलांचे शिक्षण ही शालेय शिक्षण विभागाने प्राथमिकता मानली असती आणि खरोखरच या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले असते तर ती अभिमानाची बाब ठरली असती. परंतु बारकाईने पाहिल्यास शाळाबाह्य मुलांची कमी कमी होत जाणारी संख्या ही निव्वळ धूळफेक असल्याचेच लक्षात येते.

या मुलांना जिल्हा परिषदेच्या नियमित शाळांमध्ये सामावून घेण्यात आले असा दावा जर शिक्षण विभाग करीत असेल तर तो खोटा असून जिल्हा परिषदेच्या शाळांची संख्या व तेथील पटावरील विद्यार्थी संख्या कमी झालेली दिसते.

२००२-०३ आणि २००३-०४ या दोन वर्षात केवळ ३,९२७ वस्तीशाळा सुरू करून ९२,३१७ विद्यार्थ्यांना दाखल केले गेले तर याच काळात महात्मा फुले शिक्षण हमी योजनेची १६,६३७ केंद्रे सुरू करून ३,२३,५०० विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात आले. याचाच अर्थ पर्यायी

शाळांच्या माध्यमातून जेमतेम ४ लाख मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. यातील किती मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली हा प्रश्न बाजूला ठेवला तरी **सुमारे १२ लाख शाळाबाह्य मुलांपर्यंत शासन पोहोचलेच नाही हे उघड आहे.**

केवळ आकड्यांचे खेळ करत कागदावर शाळाबाह्य मुलांची संख्या कमी झालेली दाखवायची यातच अधिकारी आपली शक्ती खर्ची पाडत असतात. या मुलांना शिकविण्याच्या आव्हानाला सामोरे जाण्याऐवजी, आपल्या पुढे असे कोणतेही आव्हानच नाही अशी इतरांची व स्वत:ची दिशाभूल ते करीत असतात. शालेय शिक्षण विभागाच्या एकूणच या प्रश्नाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल होण्याची आवश्यकता आहे.

*शाळांच्या मुख्याध्यापकांवर १००% पटनोंदणीची जबाबदारी टाकल्यानंतर त्यांनाच त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळाबाह्य मुले किती, हे विचारले जाते. साहजिकच माहिती देताना ती आपल्यासाठी अडचणीची ठरणार नाही याची काळजी घेतली जाते. हेच तालुका आणि जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांबाबतही होते. यामुळेच शाळाबाह्य राहिलेल्या मुलांसाठी अधिक प्रयत्न करण्याची अधिकाऱ्यांची तयारी नसते.*

> राज्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या दोन एक लाखांच्या आसपास असल्याचा दावा जर शासन करीत असेल तर २००५-०६ च्या कार्यक्रम अंदाजपत्रकात २००४-०५ व २००५-०६ मिळून ६,५८,०२२ शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाचे भौतिक लक्ष्य ठेवण्याची आवश्यकताच काय?

*महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेनुसार चंद्रपूर जिल्ह्यामध्ये २००२-०३ मध्ये ५६,०४३ मुले शाळाबाह्य होती. २००३-०४ मध्ये ही संख्या ९०० वर आली. या दोन वर्षात महात्मा फुले शिक्षण हमी योजना व वस्ती शाळेत मिळून जेमतेम ४,००० मुलांना दाखल करून घेतले. मग ५१,००० मुले गेली कुठे?*

*स्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*



# एक शिक्षकी शाळा व वर्गखोल्यांच्या अनुशेषामधील राज्याची प्रगती

**एक शिक्षकी शाळा :**

सर्व एक शिक्षकी शाळा किमान द्विशिक्षकी करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. मात्र जानेवारी २००५ मध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार **खाजगी शाळा वगळता राज्यातील ५८,६२६ शाळांपैकी ७,४४१ शाळा एक शिक्षकी आहेत.** *(परिशिष्ट - २)*

गेल्या काही वर्षांमध्ये एक शिक्षकी शाळांची संख्या कमी होण्याऐवजी वाढलेलीच दिसत आहे. सप्टेंबर २००१ मध्ये शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार एकशिक्षकी शाळांची संख्या १,७०८ होती. तर जानेवारी २००४ मध्ये प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ३,०८१ शाळा एक शिक्षकी होत्या. म्हणजेच गेल्या चार वर्षांमध्ये एक शिक्षकी शाळांची संख्या ५,७३३ ने वाढली आहे. याशिवाय राज्यातील **८,१३५ वस्तीशाळा एक शिक्षकी आहेतच.**

> खाजगी शाळा वगळता राज्यातील इतर शासकीय शाळा व वस्तीशाळा मिळून २६ टक्के शाळा एक शिक्षकी आहेत.

ठाणे जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे ८८८ शाळा एकशिक्षकी असून त्या पाठोपाठ रायगड, नाशिक, गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे ७५१, ४४४ व ४३९ शाळा एकशिक्षकी आहेत.

> राज्यातील एकूण एक शिक्षकी शाळांपैकी ५७ टक्क्यांहून अधिक शाळा आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आहेत.

गेली १० वर्षे जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (डीपीईपी) राबविण्यात आलेल्या औरंगाबाद (३०३), बीड (१७२) व नांदेड (१२२) जिल्ह्यांमधील एकशिक्षकी शाळांचे प्रमाणही लक्षणीय आहे.

अहमदनगर, पुणे, अमरावती, नागपूर व चंद्रपूर या आदिवासी उपयोजनेखालील जिल्ह्यांमध्येही अनुक्रमे २४४, ४३५, १७१, ११० व १८९ एवढ्या मोठ्या संख्येने एक शिक्षकी शाळा आहेत.

> शिक्षणमंत्र्यांच्या स्वत:च्या यवतमाळ जिल्ह्यात २५७ शाळा एकशिक्षकी असून, ते पालकमंत्री असलेल्या अकोला व वर्धा जिल्ह्यातील एक शिक्षकी शाळांची संख्या अनुक्रमे १२० व ११० आहे.

**शिक्षकांची कमतरता:**

शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी दिनांक २७ नोव्हेंबर २००२ रोजी केंद्रशासनाच्या अधिकाऱ्यांना एका बैठकीत दिलेल्या माहितीनुसार राज्यात **प्राथमिक स्तरावर २५,४९१ शिक्षकांची कमतरता** आहे असे असतानाही २००२-०३ साठी शासनाने सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत एकही शिक्षक प्रस्तावित केला नव्हता.

**वर्गखोल्यांचा अनुशेष :**

महाराष्ट्रात जशी शिक्षकांची कमतरता आहे तशीच वर्गखोल्यांचीही कमतरता आहे. सप्टेंबर २००१ मध्ये शालेय शिक्षण विभागाने ५१,३४५ वर्गखोल्या आवश्यक असल्याचे म्हटले होते. जानेवारी २००४ पर्यंत हा आकडा वाढून ५३,४८८ झाल्याचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडून मिळालेल्या आकडेवारीवरून दिसते, २००४-०५ च्या शालेय शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकात **वर्गखोल्यांचा अनुशेष ५५,००० असल्याचे नमूद करण्यात आले आहे.**

> जिल्हावार किती वर्गखोल्यांची आवश्यकता आहे याची माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. माहितीच्या अधिकाराखाली मागवूनही माहिती मिळालेली नाही.

वर्गखोल्यांचा अनुशेष एवढा मोठा असताना मागील काही वर्षांची शालेय शिक्षण विभागाची अंदाजपत्रके पाहता २००१-०२ मध्ये एकाही वर्गखोलीचे बांधकाम झालेले दिसत नाही. २००२-०३ मध्ये केवळ १,८७६ वर्गखोल्या तर २००३-०४ मध्ये १३,७०५वर्गखोल्या बांधण्यात आल्या. मात्र २००४-०५ व २००५-०६ मध्ये अधिक वर्गखोल्यांचे बांधकाम होणे अपेक्षित असताना दोन्ही वर्षांसाठी प्रत्येकी ६ हजार वर्गखोल्यांच्या बांधकामाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

> सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्राकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध असतानाही शिक्षकांचा व वर्गखोल्यांचा अनुशेष शासन भरून काढू शकलेले नाही, हे राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाचेच लक्षण आहे.



# शाळा नाही, पुढचे वर्ग उपलब्ध नाहीत हेच गळतीचे खरे कारण

**आदिवासी मुलांमधील गळतीचे प्रमाण राष्ट्रीय सरासरी पेक्षाही जास्त :**

सर्वसाधारणपणे शाळेत दाखल झालेल्या १०० मुलांपैकी केवळ ४८ मुले १० वीचा वर्ग पाहतात. आदिवासी समाजातील मुलांबाबत हे प्रमाण केवळ २६ आहे. आदिवासी मुलींचे याबाबतचे प्रमाण तर याही पेक्षा कमी (केवळ २३) आहे. ३८ टक्के आदिवासी मुली तर ३५ टक्के आदिवासी मुलगे पाचवीत येईपर्यंतच शाळेबाहेर फेकले जातात. केवळ ३४ टक्के आदिवासी मुली व ४२ टक्के आदिवासी मुलगे आठवीचा वर्ग पाहतात. *(परिशिष्ट -३)*

**पुढचे वर्ग नसल्यामुळे होणारी गळती :**

२००१-०२ यावर्षी राज्यात असलेल्या ६६,३९८ प्राथमिक शाळांपैकी ६२ टक्के शाळा केवळ चौथी पर्यंतच्या आहेत. या शाळांतील मुलांना त्याच शाळेत पाचवीचा वर्ग उपलब्ध नाही. तीच बाब आठवीच्या वर्गाबाबत आहे. १९९८-९९च्या आकडेवारीनुसार राज्यात पाचवी ते सातवीच्या स्तरावर १,३५,००० तुकड्या भरत होत्या. ८ वी ते १०वीच्या तुकड्यांची संख्या गेल्या काही वर्षात वाढताना दिसली तरी या वाढीत मुख्य भर ही खाजगी शाळांची आहे. १९९८-९९ मध्ये असलेल्या ११,०६७ माध्यमिक शाळांपैकी ९१ टक्के शाळा (१०,०९२) या खाजगी होत्या. केवळ ९ टक्के शाळा या शासकीय होत्या.

१९९७-९८ यावर्षी चौथीतल्या मुलांची संख्या २२,०७,०८५ होती तर १९९८-९९ या पुढच्या वर्षी पाचवीतील मुलांची संख्या २१,४९,३८१ होती. म्हणजेच ५७,७०४ विद्यार्थी त्यावर्षी चौथीतून पाचवीत पोहोचले नाहीत. त्याचप्रमाणे १९९७-९८ यावर्षी सातवीतील विद्यार्थ्यांची संख्या १७,२२,६२८ होती तर १९९८-९९मध्ये आठवीतील विद्यार्थी संख्या केवळ १५,६४,६३८ होती. म्हणजेच १,५७,९९० विद्यार्थी सातवीतून आठवीत गेले नाहीत. १९९७-९८मध्ये चौथीत असलेली २२,०७,०८५ मुले २००१-०२ मध्ये आठवीत असणे अपेक्षित आहे. परंतु त्या वर्षीचा आठवीचा पट केवळ १६,९८,१८० चा आहे. सुमारे ५,०८,९०५ विद्यार्थ्यांची मधल्या ४ वर्षांमध्ये शाळेतून गळती झाली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना पुढील वर्गात न पोहचता येण्यामागे शाळा किंवा पुढील वर्ग उपलब्ध नसणे हेच मुख्य कारण आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी २७ नोव्हेंबर २००२ रोजी केंद्रशासनाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत **३७४५ वस्त्या प्राथमिक शाळेशिवाय तर ३१९० वस्त्या उच्च प्राथमिक शाळेशिवाय** असल्याचे मान्य केले होते. एकूणच प्राथमिक शाळा उपलब्ध नसलेल्या या वस्त्या बहुतांश आदिवासी भागातील असतील हे स्पष्ट आहे. असे असतानाही २००२-०३च्या सर्व शिक्षा अभियानाच्या प्रस्तावात एकही नवी शाळा प्रस्तावित करण्यात आली नव्हती.

## शाळा नसल्याने माध्यमिक शिक्षणापासून जव्हार, मोखाड्यातील शेकडो मुले वंचित :

*२००२ मध्ये प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार जव्हारमध्ये १८२० मुले तर मोखाड्यात ८५० मुले सातवीत शिकत होती. यापैकी ८०टक्क्यांहून अधिक विद्यार्थी जिल्हा परिषद, आश्रमशाळांमधील होते. जव्हारमध्ये केवळ ८९० विद्यार्थ्यांना आठवीच्या वर्गात सामावून घेण्याची क्षमता तेथे उपलब्ध असलेल्या शाळांमध्ये आहे तर मोखाड्यात केवळ ६५० विद्यार्थीच आठवीच्या वर्गात सामावले जाऊ शकतात. म्हणजेच जव्हारमध्ये सुमारे ९३० तर मोखाड्यात सुमारे २०० विद्यार्थी आठवीचा वर्गच उपलब्ध नसल्याने शिक्षणापासून वंचित राहत असावेत.*

*या दोन्ही आदिवासी तालुक्यांमध्ये सातवीच्या पुढे शिक्षण देणारी जिल्हा परिषदेची एकही शाळा नाही. सातवीच्या पुढचे शिक्षण देणाऱ्या जव्हार मधील १८ शाळांपैकी ११ शाळा खाजगी आहेत, तर मोखाड्यातील १० शाळांपैकी ७ शाळा खाजगी आहेत.*

*ही परिस्थिती केवळ जव्हार मोखाड्याची नाही. राज्यात अनेक ठिकाणी आणि विशेषत: आदिवासी भागामध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध नाही.*

> संविधानाने शिक्षणाचा हक्क चौदा वर्षापर्यंतच्या बालकांना दिला आहे. चौदा वर्षाचे मूल आठवीत असते. आठवीचे वर्ग उपलब्ध न करून शासनाने संविधानाचा अपमान तर केलाच आहे.
> परंतु ही आदिवासींच्या शिकणाऱ्या पहिल्या पिढीची कत्तलच आहे.



# शिक्षणाच्या हमीची ऐशीतैशी

**महात्मा फुले शिक्षण हमी योजना :**

शिक्षणापासून विविध कारणांमुळे वंचित राहिलेल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने २००१ मध्ये महात्मा फुले शिक्षण हमी योजना जाहीर केली. पुढे काही महिन्यानंतर मूळ योजनेत काही चांगल्या दुरुस्त्या करण्यात आल्या. शिवाय हंगामी स्थलांतरीत मुलांसाठीही स्वतंत्रपणे शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

या योजनेसंदर्भात डिसेंबर २००१ मध्ये हिवाळी अधिवेशनात चर्चा झाली असता तत्कालिन शिक्षणमंत्र्यांनी राज्यात २४ लाख मुले शाळाबाह्य असल्याचे मान्य केले होते. साहजिकच एवढ्या मुलांना या योजनेच्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे होते. मात्र २००१-०२ ते २००३-०४ या तीन वर्षातील योजनेची अंमलबजावणी पाहता केवळ ४,०२,७३१ मुले या योजनेच्या केंद्रामध्ये दाखल झाली. यापैकी किती मुले खरोखरच शिकली याची माहिती शासनालाही नाही. *(परिशिष्ट -५)*

> महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आलेल्या मुलांची संख्या किती ? असे शासनाला माहितीच्या अधिकाराखाली विचारले असता शासनाकडे याबाबत माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले.

मुळातच शाळाबाह्य मुलांचे शिक्षण ही शासनाची प्राथमिकता नसल्यामुळे या योजनेसाठी शासनाने नेहमीच तुटपुंज्या तरतुदी केल्या. अनुदानाअभावी अनेक संस्थांना योजनेची केंद्रे अर्ध्यावरच बंद करावी लागली.

धोरणकर्त्यांची योजनेच्या अंमलबजावणी बाबतची उदासीनता साहजिकच प्रशासनातही झिरपली आहे. या योजनेची केंद्रे चालवून संस्था आपणास सहकार्य करीत आहेत, या भावनेचा अभाव अधिकाऱ्यांमध्ये दिसून येतो. अधिकाऱ्यांना ही योजना व संस्था नेहमीच डोकेदुखी वाटत आल्या आहेत.

संस्थांनी सादर केलेल्या शाळाबाह्य मुलांच्या यादीसोबत संस्थेचे प्रतिज्ञापत्र असतानाही यादीस मान्यता न देणे, अनावश्यक कागदपत्रांची मागणी करणे, प्रत्येक अर्जासोबत करारपत्र जोडावयास सांगणे, संस्थांकडून बाँड लिहून घेणे अशा अनेक अडचणी संस्थासमोर उभ्या करण्यात येतात.

मुळातच आपल्या जिल्ह्यात शाळाबाह्य मुले कशी नाहीत हे दाखविण्याचाच प्रशासनाचा अट्टाहास असल्यामुळे अधिकाऱ्यांना या योजनेची अंमलबजावणीच करावयाची नसते. २००२-०३ मध्ये योजनेची १५,३९८ केंद्रे राज्यभरात सुरू करण्यात आली व ३,०३,३५७ मुलांना या केंद्रामध्ये दाखल करण्यात आले. पुढच्याच वर्षी २००३-०४ मध्ये केद्रांची संख्या १,२३९ एवढी कमी झाली असून केवळ २०,१४३ मुलांना सामावून घेण्यात आले. त्यावर्षी ३५ पैकी केवळ १२ जिल्ह्यांमध्येच योजना राबविण्यात आली. २००४-०५ ची माहिती शासनाकडे संकलित झाली नसली तरी ही संख्या आणखी कमी झाली असण्याची शक्यता अधिक आहे. जिल्हाधिकारी व आयुक्तांवर योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी ही सर्वात महत्त्वाची तरतूद महात्मा फुले शिक्षण हमी योजनेत आहे.

> योजनेतील तरतुदीनुसार किती जिल्हाधिकाऱ्यांना
> योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार धरण्यात आले?
> असे माहितीच्या अधिकाराखाली विचारले असता याबाबतचा अहवाल
> 'निरंक' आहे असे उत्तर शासनाकडून मिळाले.

**हंगामी स्थलांतर करणाऱ्या मुलांचे शिक्षण:**

शासनाने हंगामी स्थलांतर करणाऱ्या मुलांसाठी स्वतंत्रपणे महात्मा फुले शिक्षण हमी योजना २००२ मध्ये जाहीर केली. मात्र या ही योजनेच्या अंमलबजावणीतील शासनाची उदासीनता स्पष्ट आहे.

हंगामी स्थलांतर करणाऱ्या मुलांच्या शिक्षणात स्थलांतराच्या ठिकाणी शिक्षणाची व्यवस्था नसल्यास खंड पडतो. पहिल्या २ ते ४ वर्षांमध्येच यामुळे ही मुले शाळेतून गळतात. राज्यभरातील ६ लाखाहून अधिक मुले अशाप्रकारे शाळेतून गळण्याची शक्यता असताना शासन मात्र यापैकी जेमतेम एक टक्का मुलांपर्यंत पोहोचू शकले आहे. *(परिशिष्ट - ६)*

२००२-०३ मध्ये योजनेची १०६ केंद्रे सुरू करून केवळ ४,१९१ मुलांच्या शिक्षणाची सोय स्थलांतरांच्या काळात करण्यात आली. २००३ - २००४ मध्ये ३०८ केंद्रे सुरू झाली. ज्यात ६,३३३ मुलांना सामावून घेण्यात आले. २००२-०३ मध्ये १४ जिल्ह्यांमध्ये तर २००३-०४ मध्ये ११ जिल्ह्यांमध्ये योजना राबविण्यात आली.



एकट्या ठाणे जिल्ह्यामध्ये वीटभट्ट्यांवर हंगामी स्थलांतर करणाऱ्या ६ ते १४ वयोगटातील मुलांची संख्या २५ हजार असताना २००३ -०४ मध्ये २० केंद्रांमधून केवळ ३९३ मुलांना शिकविण्यात आले. सहृदयता व लवचिकतेच्या प्रशासनातील अभावामुळे या योजनेच्या अंमलबजावणीबाबत निर्बुद्धपणे निर्णय घेतले जातात.

प्रत्यक्ष स्थलांतर होण्याआधीच मुलांच्या याद्या मागणे, स्थलांतराचा कालावधी लक्षात न घेता केंद्र चालविण्याची मागणी करणे, मूळ गावातील शाळेकडून दाखले आणण्याचा आग्रह धरणे, केंद्राचा कालावधी जेमतेम ४ ते ६ महिन्यांचा असताना मध्येच शिक्षक प्रशिक्षण आयोजित करणे ही याची काही उदाहरणे आहेत.

**प्रशासनाच्या उलट्या बोंबा :**

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना वेळेवर मानधन मिळत नाही, अनावश्यक कागदपत्रांची मागणी संस्थांकडून केली जाते. या व अशा अनेक अडचणी प्रशासनच निर्माण करत असताना २००५-०६च्या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये मात्र स्वयंसेवी संस्थांचा सहभाग कमी प्रमाणात असल्याची अडचण नमूद करण्यात आली आहे.

**साखर शाळांची कडू कहाणी :**

२००५-०६ च्या कार्यक्रम अंदाजपत्रकात हंगामी स्थलांतर करणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या मुलांनी किमान आठवी पर्यंत शाळेत टिकावे या उद्देशाने साखरशाळा सुरू करण्यात आल्याचे नमूद केले आहे. राज्यात साधारणत: पाच लाख कुटुंबे ऊसतोडणीसाठी स्थलांतरीत होतात असेही नमूद करण्यात आले आहे.

एवढ्या उदात्त हेतूने शासनाने सुरू केलेल्या साखरशाळांची संख्या केवळ १६ आहे. या शाळांतून किती मुले शिकतात याची माहिती देण्यात आली नसली तरी ६ लाख मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असताना शासनाने केलेली उपाययोजना अगदीच तुटपुंजी असल्याचे उघड आहे.

**प्राथमिक शिक्षण आमच्या प्राथम्यक्रमात नाही?**

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. समितीच्या सभा घेण्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यबाहुल्यामुळे अडचणी निर्माण होतात असे नमूद करून शासन काय सांगू इच्छित आहे?

## वस्तीशाळा - सशक्तीकरणाची आवश्यकता

एक किलोमीटर परिसरात शाळेची सुविधा उपलब्ध नसेल आणि पहिली ते चौथीचे सुमारे १५ विद्यार्थी असतील तर वस्तीवर 'वस्तीशाळा' सुरू करता येतात. राज्यभरात गेल्या चार वर्षांमध्ये ८,१३५ वस्तीशाळा सुरु करण्यात आल्या व १,८०,७७१ विद्यार्थ्यांना दाखल करून घेण्यात आले. *(परिशिष्ट -४)*

२००२-०३ मध्ये राज्यात ३७४५ वस्त्यांमध्ये प्राथमिक शाळा नाहीत अशी माहिती खुद्द शिक्षण सचिवांनी दिली असताना २००३-०४ व २००४-०५ मध्ये केवळ ८८० व ७४७ वस्तीशाळा सुरू करण्यात आल्या. अजूनही शेकडो वस्त्या प्राथमिक शिक्षणापासून वंचितच आहेत.

वस्तीशाळांमध्ये केवळ चौथीपर्यंतचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. जेथे चौथी पर्यंतच्या जिल्हा परिषदेच्या शाळा या वस्त्यांपासून दूर असतात तेथे पाचवीच्या पुढचे शिक्षण घेणाऱ्या शाळा या वस्त्यांपासून अधिकच दूर असणार हे स्पष्ट आहे.

चौथी पर्यंत वस्तीशाळांमधून शिकलेल्या या मुलांनी पुढचे शिक्षण घेऊ नये अशीच सोय केली जाते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. सामाजिक परिस्थिती लक्षात घेता वस्तीशाळांमध्ये शिकलेल्या मुली तर नक्कीच पुढील शिक्षणापासून वंचित राहत असणार हे ढळढळीत सत्य आहे.

राज्यातील वस्तीशाळांची संख्या व त्यातील विद्यार्थी संख्या पाहता प्रत्येक केंद्रामागे सरासरी २२ विद्यार्थी संख्या दिसते. बीडसारख्या जिल्ह्यात प्रत्येक केंद्रामागे सरासरी २६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्याचे लक्षात येते.

ज्या वस्तीशाळांमधील विद्यार्थी संख्या १५ पेक्षा अधिक आहे अशा वस्तीशाळांचे जिल्हापरिषदेच्या शाळेत रुपांतर करून जिल्हा परिषद शाळांसाठी, तेथील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ वस्तीशाळांना मिळणे आवश्यक आहे.

२००५-०६ या वर्षीच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात मात्र वस्तीशाळेतील विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे प्रभावी अध्यापनात अडचण येते असे म्हणत दुसरा स्वयंसेवक नेमण्याबाबत तरतूद असण्याची आवश्यकता नमूद केली आहे. शासनाने सुचविलेला हा पर्याय अत्यंत बेजबाबदार आहे. जेथे विद्यार्थी संख्येच्या निकषामुळे शाळा सुरू करणे शक्य नव्हते तेथे वस्तीशाळा सुरू करण्यात आल्या. आता जर तेथे विद्यार्थी संख्या वाढली असेल तर नियमित शाळा सुरू करणेच तर्कशुद्ध आहे.



शासन मात्र जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू न करता स्वत:ची जबाबदारी टाळत आहे.

**वस्तीशाळा शिक्षकांच्या तोंडाला पाने पुसली :**

गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय भाषणात वित्तमंत्र्यांनी वस्तीशाळांच्या शिक्षकांना रु. ५०० वाढीव मानधन देण्याची घोषणा केली होती. एकाही वस्तीशाळा शिक्षकाला गेल्या वर्षात हे वाढीव मानधन मिळाले नाही.

२००५-०६ या वर्षीच्या भाषणात अर्थमंत्र्यांनी या वाढीव मानधनाबाबत चकार शब्द काढलेला नाही. एवढेच नव्हे तर कार्यक्रम अंदाजपत्रकातच तुटपुंज्या मानधनावर काम करण्यास स्वयंसेवक नाखूष असतात व या रकमेत वाढ होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

अर्थमंत्र्यांनी गेल्या वर्षी केलेली घोषणा ही वस्तीशाळा शिक्षकांची फसवणूक करणारी तर होतीच मात्र या वर्षीच्या कार्यक्रम अंदाजपत्रकाने त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचेही काम केले आहे.

**मोफत गणवेश योजना - सब गोलमाल है**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमातींच्या दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत गणवेशाचे संच व लेखन साहित्य मोफत देण्यात येते. ही योजना १०३ विकास गट व उर्वरित राज्यात स्वतंत्रपणे राबविली जाते. राज्यभरात राबविल्या जाणाऱ्या योजनेचा तपशील पाहता २००३-०४ मध्ये ९ लाख ३० हजार ६८७ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला. म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्यावर ५१ रुपये खर्च करण्यात आले. २००५-०६ साठी दिलेल्या अंदाजात या योजनेवर ४ कोटी ५० लाख खर्च करण्यात येणार असून १४ लाख ८८ हजार ७२० विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल अशी अपेक्षा केली आहे. याचा अर्थ प्रत्येक विद्यार्थ्यामागे ३० रु. खर्च करण्यात येतील. तर १०३ विकास गटांमध्ये राबविल्या जाणाऱ्या याच योजनेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे १०० रु. खर्च करण्यात आला आहे. ३० किंवा ५० रुपयांत राज्यभर गणवेशाचे संच व लेखन साहित्य पुरविणे शक्य असताना १०३ विकास गटांमध्ये १०० रुपये खर्च करण्याची गरज काय?

## सर्व शिक्षा अभियान ...... सारे मागे जाऊ या !

केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्व शिक्षा अभियानाच्या स्वरुपात कालबद्ध कृती कार्यक्रम जाहीर केला. शिक्षण हा राज्य शासन व केंद्र शासनाचा सामायिक विषय असल्यामुळे सर्व शिक्षा अभियान हेच शासनाचे शिक्षण विषयक धोरण आहे असे म्हणता येईल.

केंद्र शासनाने जाहीर केलेली सर्व शिक्षा अभियानाची उद्दिष्टे अशी होती.

- ❑ इ.स. २००३ पूर्वी सर्व मुले शाळेत, शिक्षण हमी केंद्रात, पर्यायी शाळेत अथवा शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे.
- ❑ इ.स. २००७ पूर्वी सर्व मुलांना ५ वर्षांचे व इ.स.२०१० पूर्वी सर्व मुलांना ८ वर्षांचे प्राथमिक शालेय शिक्षण.
- ❑ इ.स.२००७ पर्यंत प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरांवरील उणीवा दूर करून, लिंगभेद व समाजाच्या विविध घटकांतील दरी भरून काढणे.
- ❑ इ.स. २०१० पर्यंत प्राथमिक शिक्षणाची समान पातळी निर्माण करणे व सर्व मुलामुलींना शाळेत टिकवून ठेवणे.

या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शिक्षकांच्या नेमणूकांपासून शिक्षक प्रशिक्षणापर्यंत, वर्गखोल्यांच्या बांधकामापासून गटसाधन केंद्र निर्मितीपर्यंत तसेच शिक्षण हमी योजना आणि पर्यायी व नावीन्यपूर्ण शिक्षणापासून मुलींच्या, अपंगांच्या व मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणापर्यंत सर्वांसाठी योजना/तरतूदी करण्यात आल्या. केंद्रशासनाने या सर्वासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली. १० व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अभियानासाठी ७५ टक्के रक्कम केंद्र शासन राज्यास उपलब्ध करून देणार आहे.

सर्व शिक्षा अभियानाचे घोषवाक्य **'सारे शिकू या सारे पुढे जाऊ या'** असे आहे. मात्र राज्य शासनाने या अभियानाबाबत दाखविलेली उदासीनता पाहता '.......... सारे मागे जाऊ या' असेच म्हणण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्रासाठी २००२-०३ व २००३-०४ मध्ये अनुक्रमे ४३१ कोटी २१ लाख व ७५७ कोटींची योजना मंजूर करण्यात आली. या दोन्ही वर्षी प्रत्यक्ष खर्च मात्र मंजूर योजनेच्या २२% व ४४ % एवढाच झाला.

राज्य शासनाने योजनेच्या २५% निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना २००२-०३ मध्ये ४.६१% तर २००३-०४ मध्ये ११.८४%



एवढाच निधी राज्याने अभियानासाठी दिला. केंद्र शासनाने उपलब्ध केलेला निधीही या दोन्ही वर्षी ३५.६८% व २७.११% एवढाच होता.

राज्य शासनाने पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध न केल्यामुळे व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने उपलब्ध निधी खर्च न केल्यामुळेच केंद्रशासनाकडून निधी येत नाही.

२००४-०५ या वर्षी सप्टेंबर २००४ पर्यंत म्हणजे सहा महिन्यांमध्ये दोन्ही शासनांकडून अभियानासाठी उपलब्ध झालेला निधी हा मंजूर योजनेच्या केवळ ३३% होता.मात्र त्यापैकीही ४०%निधी अखर्चित होता. सहा महिन्यांमध्ये मंजूर योजनेच्या २०% निधीही खर्च झाला नाही.

२५ हजार शिक्षकांची कमतरता आहे.
७ हजार शाळा एक शिक्षकी आहेत.
३ हजारहून जास्त वस्त्या शाळे शिवाय आहेत.
५५ हजार वर्गखोल्यांचा अनुशेष आहे.
१६ लाख मुले शिक्षणापासून वंचित आहेत.
तरीही निधी उपलब्ध का होत नाही ? उपलब्ध निधी खर्च का होत नाही ?

सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत नुकतेच शाळेत शिकणाऱ्या मुलांकडून शाळाबाह्य मुलांचे जलद सर्व्हेक्षण करवून घेण्यात आले. प्रत्येक कुटुंबामागे २.५ रु. खर्च करण्यात आले. महाराष्ट्रातील कुटुंब संख्या १,९५,७६,७३६ आहे. म्हणजेच सुमारे ५ कोटी रुपये यावर खर्च झाले. या सर्व्हेक्षणाचे निष्पन्न काय ? मुलांनी आणि त्यांच्या शिक्षकांनी किती गांभीर्याने हे सर्व्हेक्षण केले ? निधी खर्च होत नाही म्हणून तो असा तर खर्च केला जात नाही ना ?

अभियानांतर्गत खर्च झालेला निधी कोणत्या बाबींवर खर्च झाला याची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागवूनही मिळालेली नाही.

२००३-०४ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हावार झालेला खर्च पाहता एकाही जिल्ह्याने मंजूर निधीचा पूर्ण वापर केलेला नाही. जालना जिल्ह्याने सर्वात जास्त म्हणजे मंजूर निधीच्या ६४% निधी खर्च केला आहे. मुंबई उपनगरे या जिल्ह्याने मंजूर निधीपैकी ८६.०४% निधी वापरलाच नाही. त्यापाठोपाठ मुंबई शहर या जिल्ह्याने ७३.१३% निधी वापरलेला नाही.

२००४-०५ या वर्षी अभियानांतर्गत नोव्हेंबर २००४ पर्यंत झालेला जिल्हावार खर्च अधिकच गंभीर आहे. वर्धा जिल्ह्याने मंजूर योजनेच्या केवळ ०.७४ % निधी खर्च केला आहे. अकोला, हिंगोली, नांदेड, ठाणे, वाशिम या जिल्ह्यांनी मंजूर योजनेच्या १०% निधीही खर्च केलेला नाही.

२००४-०५ या वर्षी मंजूर योजनेच्या ३३% निधी म्हणजेच २८३ कोटी ३८ लाख रुपये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे उपलब्ध होते. यापैकी परिषदेने २५६ कोटी ५लाख रुपये (९०%) जिल्ह्यांना वितरित केले. जिल्ह्यांनी मात्र उपलब्ध निधीपैकी १६२ कोटी २२ लाख म्हणजे ६३.३५% निधी खर्च केला.

### राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना कोणासाठी?

अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात या योजनेखाली २ कोटी १८ लाख विद्यार्थ्यांना विम्याचे संरक्षण दिल्याचे म्हटले आहे. २००३-०४ मध्ये २ कोटी ८५ लाख तर २००४-०५ साठी रुपये २ कोटी ७० लाख एवढा खर्च या योजनेपोटी शासनाने केला असून तेवढ्याच खर्चाची तरतूद २००५-०६ साठी केलेली आहे.

किती विद्यार्थी व पालकांना या योजनेची माहिती आहे? किती विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला आहे? निव्वळ विमा कंपनीच्या फायद्यासाठी तर ही योजना नाही ना?

### सर्व शिक्षण अभियानाची मंजूर योजना, उपलब्ध निधी व खर्च

(रु. लाखात)

| | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ (सप्टेंबर०४) |
|---|---|---|---|
| मंजूर योजना | ४३१२१.८७ | ७५७०० | ८५,६०२.१८ |
| केंद्र शासनाकडून आलेला निधी | १५३८९.९४ | २०५२६.६७ | २०,४८९.७९ |
| राज्य शासनाकडून आलेला निधी | १९८९.७२ | ८९६३.४५ | ७,८४९.०० |
| परिषदेकडे आलेला एकूण निधी | १७३७९.६६ | २९४९०.१२ | २८,३३८.७९ |
| खर्च | ९६७१.४१ | ३३३६३.९१ | १६,८५६.८८ |
| उपलब्ध निधीच्या तुलनेत खर्चाचे प्रमाण | ५५.६५ | ११३.१४ | ५९.४८ |
| मंजूर योजनेच्या तुलनेत खर्चाचे प्रमाण | २२.४३ | ४४.०७ | १९.६९ |

*स्त्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*



## योजनांचे कागदी घोडे

**महिला सक्षमीकरण:**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबद्दल २००५-०६च्या कार्यक्रम अंदाजपत्रकात मोठ्या अभिमानाने लिहिण्यात आले आहे. मुलींना प्रवास खर्च देण्यासाठी जाहीर केलेली अहिल्याबाई होळकर योजना यापैकीच एक. मात्र गेल्या ४ वर्षांमध्ये या योजनेवर एकही पैसा खर्च करण्यात आल्याचे वा तशी तरतूद केल्याचे दिसत नाही.

**शालेय विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण:**

विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी २००३-०४ मध्ये ६ कोटी ५ लाख २६ हजार खर्च करून २८२ शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. २००४-०५मध्ये यासाठी कोणताही अर्थसंकल्पीय अंदाज करण्यात आला नाही. सुधारीत अंदाजात योजनेसाठी तरतूद करण्यात आली असली तरी २००५-०६मध्ये यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही.

निधीच्या अभावी इतर शाळांना योजनेचा लाभ तर मिळणार नाहीच परंतु ज्या संगणक प्रयोगशाळा बांधण्यात आल्या त्यांची देखभाल कशाप्रकारे होईल याचा विचारच केलेला बरा.

**शिष्यवृत्ती की शिक्षावृत्ती ?**

शालेय शिक्षण विभाग किती झापड बंद पद्धतीने योजना राबविते याचा उत्कृष्ट नमुना २००५ -०६ च्या कार्यक्रम अंदाजपत्रकात पाहावयास मिळतो. भूतपूर्व हैदराबाद राज्यातील मूळ रहिवासी असलेल्या ज्या पालकांचे उत्पन्न रु. २५५ पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांना दरमहा रु.२ ते ६ पर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येते.

आपण एवढी मोलाची मदत देत असताना विद्यार्थीच उपलब्ध होत नाहीत अशी व्यथा शालेय शिक्षण विभागाने मांडली आहे.


योजनेचे निकष कालबाह्य झाले असताना एकतर निकष बदलावेत वा योजनेची आवश्यकता नसल्यास योजनाच रद्द करावी एवढे साधे गणित असताना, आहे त्याच स्वरुपात योजना राबविण्याचा आग्रह कशासाठी?

# शालेय शिक्षण विभागाचे अर्थसंकल्पात खालावत चाललेले स्थान

शालेय शिक्षणावर होणारा खर्च हा खर्च नसून ती गुंतवणूक आहे हे मानावयास आघाडी शासन तयार नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.

राज्याच्या एकूण खर्चाच्या तुलनेत शालेय शिक्षण विभागावर होणारा खर्च काही वर्षांमध्ये कमी कमी होत चालल्याचे खालील आलेख वरून स्पष्ट होते.

*आलेख क्र. १*




*(टीप : प्र - प्रत्यक्ष, सु. अं. - सुधारित अंदाज, अ. अं.- अर्थसंकल्पीय अंदाज)*
*(स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प व अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका)*

१९९९-०० मध्ये एकूण खर्चाच्या तुलनेत शालेय शिक्षण विभागावर १६.७% खर्च झाला होता. २००३-०४ मध्ये ही टक्केवारी ११.९वर घसरली. २००४-०५ चा सुधारीत अंदाज ही केवळ ११.७% एवढाच आहे. २००५-०६ साली एकूण खर्चाच्या तुलनेत १४.६ % निधी शालेय शिक्षण विभागावर खर्च करण्यात येईल असा अंदाज वर्तविला आहे.


२००३-०४च्या खर्चाचे प्रत्यक्ष आकडे पाहता शालेय शिक्षण विभागावर झालेल्या खर्चापैकी ९८% खर्च योजनेतर होता. केवळ २ % खर्च हा योजनांतर्गत होता. २००५-०६च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्येही ९६%हून अधिक खर्च योजनेतरच असेल असा अंदाज करण्यात आला आहे. योजनेतर



खर्च जास्त असणे अपेक्षित असले तरीही कमी योजनांतर्गत खर्चाचा अर्थ **शासनाकडे शिक्षणाच्या कोणत्याही नव्या योजना नाहीत** असाच होतो.

लोकशाही आघाडी शासनाने किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या ७% खर्च शिक्षणावर करण्याचे ठरविले होते. मात्र आघाडी शासनाने एकदाही तेवढी तरतूद केलेली नाही. एवढेच नव्हे तर २०००-०१ पासून या टक्केवारीला ओहोटीच लागत चालल्याचे दिसत आहे.

*आलेख क्र. २*





*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, वार्षिक योजना )*

२०००-०१ मध्ये राज्य स्थूल उत्पन्नाच्या ३.३% खर्च शिक्षण विभागावर करण्यात आला होता. २००३-०४ मध्ये हा खर्च २.५ टक्क्यांवर आला होता. मुख्य म्हणजे २००५-०६ चा अर्थसंकल्पीय अंदाजच २.१% एवढा कमी आहे.

प्राथमिक शिक्षणावरही आघाडी शासनाने किमान समान कार्यक्रमात सांगितल्याप्रमाणे खर्च केलेला नाही. एकूण शालेय शिक्षण विभागावर होणाऱ्या खर्चा पैकी ७५% खर्च प्राथमिक शिक्षणावर करण्याचे ठरविण्यात आले होते.

आलेख क्र. ३




*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, वार्षिक योजना )*

२००१-०२ मध्ये शालेय शिक्षण विभागावरील एकूण खर्चापैकी ५९.३७% खर्च प्राथमिक शिक्षणावर झाला होता. पुढील काळात ही टक्केवारी वाढणे अपेक्षित असताना २००३-०४ या वर्षी केवळ ४८.७४%च प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यात आले. २००४-०५ चा सुधारीत अंदाज व २००५-०६ चा अर्थसंकल्पीय अंदाज जेमतेम ५० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.



## शाळाबाह्य मुलांची संख्या



| अक्र | जिल्ह्याचे नाव | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | १,६४,८११ | ३७,४५९ | ४,७०५ |
| २. | जळगाव | १,३३,९७६ | २४,०५५ | ४,२६० |
| ३. | ठाणे | १,३७,८३६ | ७९,११६ | १५,७४२ |
| ४. | धुळे | ३७,२६३ | १५,४१० | १,९३४ |
| ५. | नंदुरबार | - | १८,३४३ | ५,५४४ |
| ६. | पुणे | ९४,८३८ | १६,९४७ | १२,२१८ |
| ७. | अहमदनगर | ६८,२९२ | १०,५७४ | १०,७४३ |
| ८. | रायगड | ३९,२०८ | ८,८९५ | ४,१८१ |
| ९. | सोलापूर | ६२,६३० | २७,३७० | ३,५०८ |
| १०. | कोल्हापूर | २४,६९१ | ८,६४६ | ८८८ |
| ११. | सातारा | ६५,२६३ | ७,५२२ | ७३५ |
| १२. | सांगली | २५,३८७ | ६,०९० | १,१४७ |
| १३. | रत्नागिरी | ५७,१२९ | १३,३९० | ५,६०२ |
| १४. | सिंधुदुर्ग | २२,५४४ | १,४१३ | १,१८२ |
| १५. | औरंगाबाद | १३,३९८ | ३२,७३८ | ५,१७० |
| १६. | जालना | १३,५४१ | १४,४६१ | ४,३३१ |
| १७. | परभणी | ३१,१६५ | २२,३४७ | १०,२१५ |
| १८. | हिंगोली | - | १२,५२० | ५,९३५ |
| १९. | बीड | १९,७०६ | ३२,४२६ | ५,९०७ |
| २०. | उस्मानाबाद | १०,२१६ | ७,९०२ | ३,५९३ |
| २१. | लातूर | ९,७९० | ७,३९३ | २,१९५ |
| २२. | नांदेड | ३२,५३० | ३२,६१७ | ९,९३३ |
| २३. | अमरावती | ३०,२०४ | १९,६२५ | ५,५५३ |
| २४. | बुलढाणा | १,०५,१०१ | ४,८०६ | १,२६३ |
| २५. | अकोला | ४४,०२९ | १२,८३१ | २,७६६ |
| २६. | वाशिम | ३५,६४२ | ५,८०३ | ३,२९६ |
| २७. | यवतमाळ | ६०,३९८ | २,२७५ | २,८१६ |
| २८. | नागपूर | २५,९३१ | १३,००७ | २,१८६ |
| २९. | वर्धा | ५,१६० | १,९९२ | ५२१ |
| ३०. | भंडारा | २६,१६७ | १,६३४ | ३,७५९ |
| ३१. | गोंदिया | १८,९४३ | ९,४५० | ७०४ |
| ३२. | चंद्रपूर | ५६,०४३ | ९०० | १,४७९ |
| ३३. | गडचिरोली | १५,१२४ | ७,९०० | ६,३१५ |
| ३४. | मुंबई (उपनगर) | ३४,८५१ | ० | ७८,८९८ |
| ३५. | मुंबई (शहर) | ५७,०५६ | ६,०३० | - |
| | | १५,७८,८६३ | ५,२४,६८७ | २,२९,२२४ |

*स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*

## एक शिक्षिकी शाळा २००३-०४

| अक्र | जिल्ह्याचे नाव | एक शिक्षिकी शाळांची संख्या |
|---|---|---|
| १. | अहमदनगर | २४४ |
| २. | अकोला | १२० |
| ३. | अमरावती | १७१ |
| ४. | औरंगाबाद | ३०३ |
| ५. | बीड | १७२ |
| ६. | भंडारा | ८६ |
| ७. | बुलढाणा | ९५ |
| ८. | चंद्रपूर | १८९ |
| ९. | धुळे | ३६ |
| १०. | गडचिरोली | ४३९ |
| ११. | गोंदिया | ११५ |
| १२. | हिंगोली | २८ |
| १३. | जळगाव | ८८ |
| १४. | जालना | १११ |
| १५. | कोल्हापूर | ३१२ |
| १६. | लातूर | ७० |
| १७. | मुंबई (उपनगर) | ३२ |
| १८. | मुंबई (शहर) | ० |
| १९. | नागपूर | ११० |
| २०. | नांदेड | १२२ |
| २१. | नंदुरबार | ९७ |
| २२. | नाशिक | ४४४ |
| २३. | उस्मानाबाद | ६९ |
| २४. | परभणी | ४८ |
| २५. | पुणे | ४३५ |
| २६. | रायगड | ७५१ |
| २७. | रत्नागिरी | ३६३ |
| २८. | सांगली | १७४ |
| २९. | सातारा | ३४३ |
| ३०. | सिंधुदुर्ग | ३०७ |
| ३१. | सोलापूर | २०५ |
| ३२. | ठाणे | ८८८ |
| ३३. | वर्धा | ११० |
| ३४. | वाशिम | १०७ |
| ३५. | यवतमाळ | २५७ |
| | एकूण | ७,४४१ |

*स्त्रोत: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*





## इयत्तावार गळतीचे प्रमाण २००१-२००२

| इयत्ता | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| १ | ० | ० | ० |
| २ | ६ | ६ | ६ |
| ३ | ९ | ९ | ९ |
| ४ | १५ | १५ | १५ |
| ५ | १२ | १४ | १३ |
| ६ | १७ | १९ | १८ |
| ७ | २६ | २७ | २६ |
| ८ | ३४ | ३८ | ३६ |
| ९ | ३९ | ४४ | ४१ |
| १० | ५० | ५५ | ५२ |

## इयत्तावार गळतीचे प्रमाण
## (अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती) २००१-२००२

| | अनुसुचित जाती | | | अनुसुचित जमाती | | |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | ८ | ७ | ७ | १२ | ११ | ११ |
| ३ | १० | ८ | ९ | १८ | १८ | १८ |
| ४ | १६ | १५ | १५ | २७ | २७ | २७ |
| ५ | १० | १४ | १२ | ३३ | ३८ | ३५ |
| ६ | १६ | २० | १८ | ४३ | ४७ | ४५ |
| ७ | २९ | ३३ | ३१ | ५२ | ५६ | ५४ |
| ८ | ३५ | ४३ | ३९ | ५८ | ६६ | ६२ |
| ९ | ४४ | ४९ | ४६ | ६० | ७० | ६७ |
| १० | ५४ | ६२ | ५८ | ७२ | ७७ | ७४ |

*स्त्रोत : निवडक शैक्षणिक सांख्यिकी २००१-२००२*

# राज्यातील वस्तीशाळा - २००१ ते २००५

परिशिष्ट -४

| अक्र | जिल्ह्याचे नाव | केंद्र संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | ६१५ | १४,६४७ |
| २. | धुळे | २३२ | ५,३५२ |
| ३. | जळगाव | १८३ | ४,०१७ |
| ४. | बुलढाणा | १०२ | १,९३४ |
| ५. | अकोला | ४५ | ९६२ |
| ६. | वाशिम | ३३ | ६२५ |
| ७. | अमरावती | ५७ | ७७५ |
| ८. | वर्धा | १९ | ३५३ |
| ९. | नागपूर | ११५ | १,७०० |
| १०. | भंडारा | २२ | २९९ |
| ११. | गोंदिया | २०३ | २,७०३ |
| १२. | गडचिरोली | २०० | ४,१३७ |
| १३. | चंद्रपूर | १०२ | १,२८७ |
| १४. | यवतमाळ | २८९ | ६,०३९ |
| १५. | नांदेड | २४८ | ५,८८६ |
| १६. | हिंगोली | ८६ | १,८४० |
| १७. | परभणी | १०६ | ३,७६५ |
| १८. | जालना | ४३६ | ८,८७० |
| १९. | औरंगाबाद | ७०४ | १६,७०३ |
| २०. | नाशिक | ५३७ | १२,२२३ |
| २१. | ठाणे | ५८० | १२,८२० |
| २२. | रायगड | २५१ | ४,८८७ |
| २३. | पुणे | ३३५ | ६,८९४ |
| २४. | अहमदनगर | ४४६ | ११,९९९ |
| २५. | बीड | ८४३ | २२,१२९ |
| २६. | लातूर | ६५ | १,६१० |
| २७. | उस्मानाबाद | १५६ | ३,२९५ |
| २८. | सोलापूर | ४४१ | ११,३३२ |
| २९. | सातारा | १८० | २,९०३ |
| ३०. | रत्नागिरी | १०३ | १,५९१ |
| ३१. | सिंधुदुर्ग | ३१ | ४१४ |
| ३२. | कोल्हापूर | २६६ | ४,८२१ |
| ३३. | सांगली | १०४ | १,९५९ |
| | एकूण | ८,१३५ | १,८०,७७१ |

*स्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*



परिशिष्ट -५

# राज्यातील महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे - २००१ ते २००४

| अक्र | जिल्ह्याचे नाव | केंद्र संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | ३५१ | १,३१६ |
| २. | धुळे | ३८७ | ६,७६९ |
| ३. | जळगाव | १,४८१ | २४,३५४ |
| ४. | बुलढाणा | ८३६ | १३,९४५ |
| ५. | अकोला | २२३ | ४,४२३ |
| ६. | वाशिम | ५३५ | ७,५०३ |
| ७. | अमरावती | ६७० | १२,११४ |
| ८. | वर्धा | ५१ | ४८९ |
| ९. | नागपूर | ५०९ | ७,५३६ |
| १०. | भंडारा | ६४ | ६६४ |
| ११. | गोंदिया | ७२ | ९७८ |
| १२. | गडचिरोली | ३०६ | ३,८५८ |
| १३. | चंद्रपूर | ३९२ | ६,९१४ |
| १४. | यवतमाळ | ८०६ | १४,२७२ |
| १५. | नांदेड | १९३१ | ९२,७९० |
| १६. | हिंगोली | ६८० | १०,५४० |
| १७. | परभणी | १२८६ | २२,२७६ |
| १८. | जालना | ११७५ | १७,०५५ |
| १९. | औरंगाबाद | ७९२ | १२,३८० |
| २०. | नाशिक | १५३३ | २६,६३४ |
| २१. | ठाणे | १५६६ | ३०,६७५ |
| २२. | रायगड | ४१९ | ५,३३८ |
| २३. | पुणे | ५४९ | १२,८४१ |
| २४. | अहमदनगर | ४०२ | ५,७५२ |
| २५. | बीड | १४०६ | २१,३४७ |
| २६. | लातूर | ६१८ | ११,११० |
| २७. | उस्मानाबाद | ३५९ | ४,९०० |
| २८. | सोलापूर | ५९३ | ९,७९९ |
| २९. | सातारा | ३१६ | ४,७४१ |
| ३०. | रत्नागिरी | १९ | १८७ |
| ३१. | सिंधुदुर्ग | १४ | २६३ |
| ३२. | कोल्हापूर | १२७ | २,३०३ |
| ३३. | सांगली | १६९ | २,९०६ |
| | एकूण | २०,६३७ | ४,०२,७३१ |

*स्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*

## हंगामी स्थलांतरीत मुलांसाठी सुरू केलेल्या महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रांची व विद्यार्थ्यांची संख्या

| अक्र | जिल्ह्याचे नाव | २००२-०३ | | २००३-०४ | |
|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | विद्यार्थी | केंद्र | विद्यार्थी |
| १. | नाशिक | ६ | १४८ | ५६ | १६५८ |
| २. | ठाणे | निरंक | निरंक | २० | ३९३ |
| ३. | धुळे | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४. | नंदुरबार | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५. | जळगाव | १३ | ४४१ | १२ | २३४ |
| ६. | पुणे | ३६ | ९१६ | ७५ | १६२७ |
| ७. | अहमदनगर | ३० | ९१३ | १०६ | १५९३ |
| ८. | रायगड | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ९. | सोलापूर | १ | २३० | निरंक | निरंक |
| १०. | कोल्हापूर | ८ | ४८९ | ८ | १६४ |
| ११. | सातारा | २ | १९७ | निरंक | निरंक |
| १२. | सांगली | ४ | ३७६ | १३ | ३०६ |
| १३. | रत्नागिरी | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १४. | सिंधुदुर्ग | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १५. | औरंगाबाद | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १६. | जालना | १ | १०५ | २ | ४३ |
| १७. | बीड | १ | १९ | निरंक | निरंक |
| १८. | नांदेड | १ | १५२ | निरंक | निरंक |
| १९. | उस्मानाबाद | १ | २० | निरंक | निरंक |
| २०. | लातूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २१. | परभणी | १ | २९ | ४ | १०२ |
| २२. | हिंगोली | १ | १५६ | ४ | ८३ |
| २३. | नागपूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २४. | भंडारा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २५. | गोदिया | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २६. | चंद्पूर | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २७. | गडचिरोली | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २८. | वर्धा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| २९. | अमरावती | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३०. | अकोला | निरंक | निरंक | ८ | १३० |
| ३१. | वाशिम | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३२. | बुलढाणा | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३३. | यवतमाळ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

*स्त्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद*

# समर्थनची प्रकाशने

१. २०००-०१ अर्थसंकल्प (मराठी व इंग्रजी)
२. विधिमंडळ - रचना व कार्यपध्दती*
३. अत्याचार प्रतिबंधक कायदा
४. मतदान - मतगणना - मार्गदर्शिका
५. आदिवासी स्वशासन कायदा
६. राष्ट्रीय पोलीस आयोग
७. मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३
८. प्रसारमाध्यम - ॲडव्होकसी अभ्यास
९. जनतेचा जाहिरनामा
१०. महाराष्ट्र संदर्भ पुस्तिका*
११. महात्मा फुले शिक्षण हमी योजना - माहिती पुस्तक*
१२. शापित - आरे कॉलनी येथील आदिवासींच्या समस्या (लेखक - नितीन पाटील)
१३. महाराष्ट्राचे विधिमंडळ - विभाग संलग्न स्थायी समित्या - उपस्थिती व कामकाजाचा अहवाल
१४. वंचितांचं जिणं - वडार समाजाच्या समस्यांविषयी (लेखक - नितीन पाटील)
१५. महाराष्ट्राचे विधिमंडळ - गेल्या पाच वर्षांतील हिवाळी अधिवेशनातील कामकाजाचा संक्षिप्त अहवाल
१६. संविधान विशेषांक
१७. पोलिस विशेषांक
१८. मानवी हक्क आयोग विशेषांक
१९. संविधानाने बहाल केलेल्या अधिकारासंबंधातील पोस्टर्सचा संच *

## समर्थनची आगामी प्रकाशने*

- महाराष्ट्राची ११वी विधानसभा विशेषांक
- राज्य अर्थसंकल्प विषयक पुस्तिका

** विक्रीसाठी उपलब्ध*

महाराष्ट्रातील शालेय शिक्षण विषयक परिस्थिती अतिशय गंभीर आहे. शालेय शिक्षण आजही राज्यकर्त्यांच्या अजेंड्यावर नाही. अजुनही लाखो मुलांनी शाळेत पाय ठेवलेला नाही. या मुलांनी शाळेत यावे, टिकावे असे शासनाचे धोरण नाही. ज्या उदासिनतेने योजनांची अंमलबजावणी होत आहे ते पाहता या प्रश्नावर जनआंदोलन उभे राहण्याची आवश्यकता आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणाचा प्रश्न शासन, शैक्षणिक संस्था एवढ्या पुरताच मर्यादित राहून चालणार नाही. विविध जनसंघटना, व्यावसायिकांच्या संघटना (उदा. बार असोसिएशन्स, पत्रकार संघ) यांनीही अभियानात सहभागी झाल्यास आंदोलनाची धार वाढेल. प्रसार माध्यमांची साथ तर आंदोलनांना नेहमीच ताकद देत आली आहे.

शासनाच्या उदासिनतेला विरोध करतानाच काही वेळा शासनाच्या चांगल्या प्रयत्नांमध्ये सहभागीही होऊ. 'शक्य तेथे सहकार्य आणि आवश्यक तेथे संघर्ष' ही याही आंदोलनाची रणनीती राहील.

संघटीत प्रयत्नांवर विश्वास असणाऱ्यांचे, आंदोलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांचे स्वागत आहे. समर्थनशी जरुर संपर्क साधा.

